# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर

Email: chair.aurboard@mahedu.gov.in/sschscboardabad@gmail.com
Tel: Div.Chairman(P) : (0240)-2331116 EPABX -2334228/2334284 Div. Secretary (P) :2341035


जाक्रछसंविमं/लेखा/4090
दि. 26/10/2026

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व
कनिष्ठ महाविदयालये,
छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी/हिंगोली.

विषय- दुष्काळग्रस्त भागातील विदयार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत...
संदर्भ- १. क्र.रा.मं/परीक्ष-३/३४५४ दि.१३/०८/२०२६ चे पत्र.
२. क्र.रा.मं/परीक्ष-३/३५०७ दि.१८/०८/२०२६ चे पत्र.
३.मदत व पुनर्वसन विभाग,मंत्रालय, यांचा शासन निर्णय क्रमांक समिती २०२६/प्र.क्र/८२/मदत-२, दिनांक २५/०९/२०२६.
४.क्र.रामं/लेखा/दुष्काळग्रस्त फीस माफी/२६-२७/४०४४ दि.२९/०९/२०२६
५.क्र. रामं/लेखा/दुष्काळग्रस्त फीस माफी/२६-२७/४५५० दि.२४/१०/२०२६

उपरोक्त संदर्भानुसार शासनाने घोषित केलेल्या दुष्काळग्रस्त ३०५ तालुक्यांतील विदयार्थ्यांना फेब्रु/मार्च २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत्त इ.१० वी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ. १२ वी परीक्षेसाठी परीक्षा शुल्क माफीचा लाभ देण्याबाबत शासनाने निर्देश दिलेले आहे.

त्यानुसार संदर्भिय पत्रानुसार खालीलप्रमाणे दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र विदयार्थ्यांना शासनाच्या नियम व अटींनुसार परीक्षा शुल्क माफीचा लाभ देण्यात यावा.

१. दि. १४ ऑक्टोबर २०२६ च्या शासन निर्णयानुसार जाहीर झालेल्या राज्यातील दुष्काळग्रस्त भागामध्ये आपत्तीची परिस्थिती उद्भवलेल्या दुष्काळग्रस्त एकूण ३०५ तालुक्यांतील मंडळाच्या माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२७ मधील परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफीचा लाभ देण्यात येणार आहे.

२. दुष्काळग्रस्त एकूण ३०५ तालुक्यांव्यतिरिक्त इतर सर्व तालुक्यांतील विद्यार्थ्यांनी विहित पद्धतीनुसार व विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

३. सदर योजना शासकीय/खाजगी अनुदानित/विना अनुदानित, स्वयंअर्थ सहाय्यित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लागू राहील.

४. जे विद्यार्थी त्याच परीक्षेस दुसऱ्यांदा बसले असतील (रिपिटर) अशा विद्यार्थ्यांनासुद्धा सदर सवलत लागू राहील.

५. जे विद्यार्थी बहिःस्थ (एक्सटर्नल) म्हणून नोंदले असतील अशा विद्यार्थ्यांनासुद्धा सदर सवलत लागू राहील.

६. शहरी भागात वास्तव्यास असलेले, परंतु दुष्काळग्रस्त तालुक्यात शेतजमीन असणाऱ्या पालकांचे विद्यार्थी पाल्य यांनासुद्धा सदर सवलत लागू राहील.

७. शिक्षणासाठी अन्य ठिकाणी/शहरात वास्तव्यास असलेले परंतु मूळ गाव दुष्काळग्रस्त तालुक्यात असलेले विद्यार्थी यांना सुद्धा सदर सवलत लागू राहील.

८. दुष्काळग्रस्त/टंचाईग्रस्त भागातील इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची आवेदनपत्रेसुद्धा परीक्षा शुल्क न घेता भरून घेण्यात यावीत. त्यांचे परीक्षा शुल्क शासनाच्या संबंधित विभागाकडून एकत्रित प्रस्ताव पाठवून राज्य मंडळामार्फत घेण्यात येणार आहे.

९.सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी वैयक्तिक लक्ष घालून विहित कालावधीमध्ये अवेदन पत्रे भरुन घ्यावीत.

**१०. मुख्याध्यापकांनी आवेदनपत्रे भरून घेण्याची कार्यवाही ७ दिवसांत म्हणजेच ३१/१०/२०२६ पर्यंत करावयाची आहे. दुष्काळग्रस्त भागातील पात्र विद्यार्थ्यांची माहिती भरण्यासाठी Institute Login मध्ये Application = Drought Entry / दुष्काळग्रस्त नोंद हा पर्याय निवडून माहिती भरावी.**

११. दुष्काळग्रस्त भागातील सवलतीस पात्र विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क भरले असेल, तर सदर शुल्काची परतावा रक्कम विद्यार्थ्यांच्या/पालकांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येणार असल्याने, विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाशी संलग्न बँक खात्याची माहिती उपलब्ध न झाल्यास अथवा चुकीची माहिती अथवा चुकीचा आधार क्रमांक दिल्यास सदर लाभापासून विद्यार्थी वंचित राहणार असल्याने परिपूर्ण माहिती निर्धारित कालावधीमध्ये भरण्याची दक्षता घ्यावी. ही जबाबदारी पूर्णतः संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.

**१२. ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी जमा करून घेतलेले आहे, तथापि मंडळाकडे भरणा केलेला नाही, असे जमा केलेले शुल्क त्यांच्या स्तरावरून विद्यार्थ्यांना तात्काळ परत करावे. ही जबाबदारी पूर्णतः संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.**

उपरोक्त प्रमाणे निकषांची व अन्य आवश्यक बाबीची संदर्भिय शासन निर्णयानुसार खात्री करुन घेण्यात यावी. व त्यानुसार सदरील योजनेच्या अंमलबजावणीसाठी विहित मुदतीत विदयार्थ्यांचे आवेदन पत्रे करुन घेण्यात यावीत.

**मा.वि. अध्यक्ष यांच्या मान्यतेने.**

(आर.बी.वाणी)
विभागीय सचिव
छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळ,
छत्रपती संभाजीनगर

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव
१.शिक्षण उपसंचालक , छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर
२.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी/हिंगोली.
३.मा.सचिव राज्य मंडळ पुणे यांना माहितीस्तव